नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/02/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर बायपास चौक उमरेड येथे दिनांक 25/02/2021 चे 11.30 वा. ते 11.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बुधाराम पांडुरंग मांढरे, वय 53 वर्ष, रा. सोनेझरी खांदाडे ले आउट उमरेड यांनी श्रीकृष्ण को ऑपरेटीव्ह बॅक उमरेड येथुन घराचे बांधकामाकरिता 75,000/–रू. काढले व आपले बॅग मध्ये टाकुण आपले हिरो होन्डा मोटरसायकल क्र. एमएच– 31/ एयु– 4846 ने पेट्रोल पंप वर जावुन आपले मोटरसायकल मध्ये पेट्रोल भरून ग्राहक सुविधा केंद्रात जावुन 20,000/–रू. भरले व उर्वरित 55,000/–रू. आपले बॅगमध्ये ठेवुन बॅग मोटरसायकलचे हॅन्डलला लटकवुन ठेवली. यानंतर फिर्यादी हे चिंतामणी टायर्समध्ये आपले मुलाला भेटण्यास जात असता बायपास चौक येथे सतीश चौधरी यांचे दुकाना समोर लावली असता मोटरसायकलचा चाक पंचर दिसल्याने व फिर्यादीचा पॅन्ट भरल्याने पॅन्ट धुन्याकरिता चिंतामणी टायर्स दुकाना समोर जावुन आपला पॅन्ट धुवून आपले मोटरसायकल जवळ आले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने मोटरसायकलचे हॅन्डला लटकविलेली बॅग ज्यामध्ये नगदी 55,000/–रू, ऑफिसचे कागदपत्रे, बॅकेचे पासबुक व पेनड्राईव्ह सी एम पी पावती सह बॅग चोरून घेवुन गेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा विठ्ठल तितरमारे 7722004342 हे करीत आहे.

## रेती चोरी करणारा आरोपी अटक

पो.स्टे. पारशिवनी:– दिनांक 25/02/2021 चे 01.40 वा.ते 02.20 वा. दरम्यान विना क्रमांकाचा ट्रैक्टर व ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– राजकुमार सुरजसिंग खुरावत, वय 38 वर्ष, रा. पारशिवनी याने त्याच्या ताब्यातील वाहनात महादुला शिवारातील कन्हान नदीच्या पात्रातील विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 4,000/– रू. ची भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 7,54,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मुदसर जमाल यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. सहकलम 236/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संदीप कडु 9823722418 हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. सावनेर :–दि. 25/1021/2021 चे 21:30 वा. चे सुमारास 40 वर्षीय पीडित/फिर्यादी हि कामावरून परत येत असतांना आरोपी नामे– गजानन जौहर, वय 32 वर्ष, रा. रेल्वे स्टेशन मागे, सावनेर हा मोटरसयकलने तिच्या मागुन येवून तिचा रस्ता रोखुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 341, 354 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा बोरकर कारंडे 9823581297 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर